**PARISHRAM PUBLICATIONS**

Std.: X (English) | Marathi | Marks: 80


Date: 20-Dec-2019 | Parishram Academy | Time: 3 hrs

Chapter: All

**विभाग १ - गदय**

**Q.1 (अ) उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**1 A1)** चौकटी पूर्ण करा 2




शेवटी सर्वांच्या मते मी सकाळी रनिंग करावे आणि संध्याकाळी दोरीवरच्या उड्या माराव्यात असे ठरले आणि मी सातव्या बशीमधली भजी उचलली.

कुटुंबाचा मात्र माझ्या 'डाएटच्या ' बाबतीतला उत्साह अवर्णनीय होता, कारण रोज काही काही चमत्कारिक पदार्थ माझ्या पानात पडायला लागले. एके दिवशी नुसती पडवळे उकडून तिने मला खायला घातली. शेवग्याच्या शेंगा, पडवळ, भेंडी, चवळीच्या शेंगा वगैरे सडपातळ भाज्यांचा खुराक तिने चालू केला. कोबी, कॉलिफ्लॉवर वगैरे बाळसेदार मंडळींची स्वयंपाकघरातून हकालपट्टी झाली. सकाळचा चहादेखील सुरुवातीला होता तसा राहिला नाही. बिनसाखरेचा चहा इतका कडू लागत असेल अशी यापूर्वी कधीच कल्पना आली नाही मला.

"चहा सुरुवातीला बिनसाखरेचा असूनही कडू लागला नाही आणि आता का लागतो तेवढं सांग", असे म्हटल्यावर कुटुंबाकडून खुलासा मिळाला.

"हेच ते-म्हटलं ते काय उगीच? अहो, म्हणजे सुरुवातीला मी तुम्हांला जो बिनसाखरेचा चहा दिला तो बिनसाखरेचा नव्हताच मुळी!"

"नव्हता? मग मला बिनसाखरेचा चहा म्हणून काय सांगितलंस?"

"अहो, थोडीशीच राहिली होती साखर, ती संपेपर्यंत म्हटलं घालू. काल संपली. आजपासून बिनसाखरेचा चहा केलाच की साखर न घालता."

"म्हणजे खलास! अग, किती लाख कॅलरीज गेल्या असतील माझ्या पोटात. कसलं कमी होतंय माझं वजन? पण ? सांगितलं का नाहीस मला?"

**A2)** i) एका वाक्यात उत्तर लिहा 1

पत्नीने कोणती भाजी उकडून वाढली ?

ii) कारणे लिहा 1

लेखकाच्या पानात रोज चमत्कारिक पदार्थ पडू लागले कारण

**A3)** स्वमत 3

उत्तम आरोग्यासाठी व्यायामाचे महत्त्व तुमच्या शब्दांत लिहा.

**(आ) उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**1 A1)** i) चौकटी पूर्ण करा 1

1) रेखामावशी राहत असलेले ठिकाण - [ ]

2) रेखामावशी वापरत असलेले वाहन - [ ]

ii) चौकटी पूर्ण करा 1

स्क्रीनवर रेखामावशीच्या पावलांच, आलेले वर्णन

→ [ ] → [ ]

> “मावशी, तुम्ही राहता कुठं?”
> “त्या टेकडी पल्याड”, मावशी म्हणाल्या.
> “इथून किती कि. मी. आहे?”
> “तीन.”
> “तुम्ही कशा आलात इथपर्यंत?”
> “गेल्या मयन्यापतूर चालतच येत हुते; पन आता माज्या लेकानं एक सायकल दिलीया मला. तवा आता सायकलनं येते.” अशी अजून बरीच माहिती त्यानं भरली. आठवड्यातून सरासरी किती किलोमीटर फिरती होते? ही फिरती तुम्ही कशी करता? आतापर्यंत किती झाडं तुम्ही लावली आहेत?
> रेखामावशी फिरायच्या पायीच, कधीतरी सायकलनं! त्यांच्या इवल्याशा झोपडीपुढंही त्यांनी दोन झाडं लावली होती. त्यातलं एक लिंबोणीचं होतं; पण एवढी सगळी माहिती सुमित का घेतोय, तेच कुणाला कळेना. रेखामावशी तर फार गडबडून गेल्या. “आणि आता पाहा, या आहेत रेखा मावशींच्या फूटप्रिन्टस...! असं म्हणत त्यानं मोबाईलचं कसलंसं बटन दाबलं आणि स्क्रीनवर पायपुसणीच्या आकाराचा एक निळा चौकोन उमटला, अगदी आभाळाच्या निरभ्र तुकड्यासारखा! सगळे ‘आ’ वासून पाहत होते आणि त्या निळ्या तुकड्याच्या मधोमध दोन पावलं उमटली...एकदम चंदेरी वर्खात मढलेली आणि खाली इंग्रजीत शब्द उमटले...‘सिल्व्हर फूटप्रिन्टस! दि मोस्ट क्लिनली फूटप्रिन्टस!!’
> “वाऽ पाह्यलंत रेखामावशीचे पाय चंदेरी आहेत. एकदम स्वच्छ. झऱ्याच्या स्फटिक स्वच्छ पाण्यासारखे,” सुमित ओरडला. “ह्याऽ हे भलतंच!” रेखा मावशींच्या पायाकडे पाहत पावडेकाका म्हणाले.
> सुमितनं हलकेच पावडेकाकांच्या गोजिऱ्या तळव्यांकडे पाह्यले आणि म्हणाला, “काका, आपण तुमच्यापायाचं पाहू या का?”
> “त्यात पाह्यचं काय? हे बघ, माझे पाय किती स्वच्छ आणि मऊसूत आहेत...!” पावडेकाका पाय सगळ्यांना दाखवत म्हणाले. “पण चला काय सांगतंय तुमचं ॲप, ते तरी पाहू या,” त्यांनी पुस्ती जोडली.

**A2)** i) चौकटी पूर्ण करा 1

सुमितने रेखामावशीच्या पायांचे, वर्णन करताना म्हटले

→ [ ] → [ ]

ii) सत्य की असत्य ते लिहा 1

1) स्क्रीनवर पावडेकाकांच्या पावलांसाठी चंदेरी आकाराचा चौकोन उमटला.

2) पावडेकाकांचे पाय मऊ व स्वच्छ आहेत.


**A3)** स्वमत 3

जागतिक तापमान वाढ होत असताना झाडे लावणे किती महत्त्वाचे आहे ते स्पष्ट करा?

**अपठित गदय**


**(इ) उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**


1 **A1)** चौकटी पूर्ण करा 2




निसर्गाचे प्रत्येक दृश्य माणसाच्या मनाला आनंदित करणारे आहे. सूर्यास्ताच्या वेळी आकाशात अवर्णनीय शोभा दिसते. सूर्यबिंब लालभडक झालेले असते आणि मेघांच्या पटलावर संध्यारागाच्या अनंत छटा पसरलेल्या असतात. किलबिलाट करीत  घरटयाकडे पक्षी परतत असतात. सकाळी भिन्न भिन्न मार्गांनी उडालेले हे पक्षी संध्याकाळी मात्र गटगटाने घरटयाकडे येतात. रानावनात चरावयास गेलेली गुरेढोरे सुद्धा आतुरतेने घराकडे येत असतात. गाईची आचळं वासरांच्या ओढीने तुडूंब भरलेली असतात. अधीर होऊन हंबरतच त्या गोठयाकडे धावतात. तेव्हा त्यांच्या गळ्यातील तो घंटानाद कानाला तृप्त करतो. त्याचवेळी त्यांच्या पावलांनी उडालेली धूळ वातावरणातील लाल रंगात मिसळते आणि वातावरणाला पवित्र करते. मंद मंद वाऱ्याच्या झुळका झाडे वेलींना हिंदळवतात. हळूहळू काळोखाची मखमल धरती पांघरते आणि सारे विश्व विश्रांतीत रममाण होते.

**A2)** चौकटी पूर्ण करा 2


1) 


2) 


**विभाग २ - पदय**

**Q.2 (अ) खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

1 **A1)** उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. 2




झाड बसते ध्यानस्थ ऋषिसारखं मौन व्रत
धारण करून तपश्चर्या करत...
पक्षी झाडांचे कुणीच नसतात
तरीही झाड त्यांचं असतं
मुळावर घाव घातला तरी झाड मुकाट सहन करते
झाडांच्या पानावरून वहीच्या पानावर
अलगद उतरतात दवांचे टपोरे थेंब
झाडाकडे टक लावून पाहिलं तर
शरीरभर विरघळतो हिरवा रंग
रक्त होते क्षणभर हिरवेगार

आयुष्य होतं नुकत्याच खुडलेल्या फुलासारखं टवटवीत
झाडाचे बाहु सरसावलेले असतात मुसाफिराना कवेत घेण्यासाठी
पानझडीनंतर झाड पुन्हा नवीन वस्त्र धारण करतं
नव्या नवरीसारखं
झाडाला पालवी फुटल्यावर फुटते शरीरभर पालवी
अन झटकली जाते मरगळ
पक्ष्यांच्या मंजुळ नादात झाडाचंही जीवनाचं
एक संथ गाणे दडलेले असते
हसावं कसं सळसळत्या पानासारखं
मुळावं मुरावं कसं तर? झाडासारखं घट्ट पाय रोवीत
जगावं कसं तर? हिरवंगार झाडासारखं
रोजचं चिंतन करावं कसं तर झाडासारखं!

**A2)** i) प्रश्न तयार करा 1

' ऋषिसारखं ' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

ii) एका वाक्यात उत्तर लिहा 1

झाडाच्या जीवनाचं गाणं कशात दडलेलं असते ?

**A3)** प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा. 2

i. झाड -
ii. ऋषी -
iii. मुकाट -
iv. दव -

**A4)** काव्यसौंदर्य 2

खालील ओळींचा तुम्हाला कळलेला अर्थ लिहा.
'हसावं कसं सळसळत्या पानांसारखं '

**(आ) कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरून कृती सोडवा. (8)**

दोन दिवस कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरून कृती सोडवा.

१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री (०१ गुण)
२) कवितेचा विषय (०१ गुण)
३) खालील ओळींचा अर्थ स्पष्ट करा. (०२ गुण)
शेकडो वेळा चंद्र आला, तारे फुलले रात्र छुंद झाली,
भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली.
४) कविता आवडण्याची व न आवडण्याची कारणे (०२ गुण)
५) कवितेतून मिळणारा संदेश (०२ गुण)

**किंवा**


अंकिला मी दास तुझा कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरून कृती सोडवा.

१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री (१ गुण)
२) कवितेचा विषय (१ गुण)
३) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे (२ गुण)
४) कवितेतून मिळणारा संदेश (२ गुण)
दिलेल्या ओळींचा अर्थ लिहा.
५) अग्निमाजि पडे बाळू |
माता धावें कनवाळू ||२|| (२ गुण)


**विभाग ३ - स्थूलवाचन**

**Q.3 खालील कोणत्याही दोन कृती सोडवा. (6)**

1) खालील 'व्युपत्ती कोश' मुद्द्यांवर एक पारिच्छेद तयार करा. (7 ते 8 वाक्यांत)




2) पाठाबाहेरील उदाहरणे शोधून खालील कृती करा.




उदा. जल, नीर, तोय. पाणी.
उदा. पान-झाडाचे (पर्ण) पान (पृष्ठ) पुस्तकाचे पान.

3) ' पाणी हेच जीवन !' या विधानासंबंधी तुमचे विचार लिहा.

**विभाग ४ - भाषाभ्यास**

**Q.4 (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती सोडवा.**

**(१) वाक्यांचे प्रकार ओळखा -** **(2)**

i. उत्तम आरोग्यासाठी व्यायाम करा.
ii. अब्दुल एखाद्या अपराध्यासारखा खाली मान करून जेवू लागला.

**(२) वाक्यरुपांतर -** **(2)**

1) पावडेकाकांचे पाय स्वच्छ होते. (नाकारार्थी वाक्य करा)

2) देखावा खूपच सुंदर आहे. (उद्गारार्थी करा)

**(३) खालील वाक्यप्रचारांचा अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा. (फक्त २)** **(4)**

1) हेवा वाटणे →

2) पार करणे →

3) रममाण होणे →

**(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.**

**(१) शब्दसंपत्त्ती -**

**(i) समानार्थी शब्द लिहा.** **(1)**

1) i. श्रीफळ - ...............
ii. मंदिर - ...............

**(ii) विरुद्धार्थी शब्द लिहा.** **(1)**

1) i. रोगी × ...............
ii. इच्छा × ...............

**(iil) शब्दसमुहाबद्दल एक शब्द लिहा.** **(1)**

i. विद्या शिकणारा → ................
ii. चित्र काढणारा → ................

**(iv) वचन बदला.** **(1)**

चेंडू - ...............
छत्री - ................

**(२) लेखननियमांनुसार लेखन -**

**लेखननियमांनुसार बदल करा.** **(2)**

**1)** आई हीच प्रत्येक मूलाची पहिली शीक्षक असते.

**2)** मी झटकन पुढं जाऊन वाकुण बघितलं.

**(३) विरामचिन्हे -** **(2)**

**1)** विरामचिन्हांचा योग्य वापर करा.
आपणही यांच्याप्रमाणेच खेळावे अशी इच्छा मनात येई.

**2)** विरामचिन्हांचा योग्य वापर करा.
हळूहळू मी सगळ्या शाली वाटून टाकल्या गरीब श्रमिकांना

**विभाग ५ - उपयोजित लेखन**

**Q.5 (अ) 1. पत्रलेखन -** **(6)**

**खालील विषयावर पत्र लिहा.**

खालील निवेदन वाचा व त्याखालील कोणतीही एक कृती सोडवा.

आकर्षक बक्षिसे

प्रवेश नि:शुल्क

**आदर्श विद्यालय**

बोपर्डी, ता. वाई, जि. सातारा

**तालुकास्तरीय आंतरशालेय चित्रकलास्पर्धा**

स्पर्धा दोन गटांसाठी आयोजित

गट क्र. १ - इ. ५ वी ते इ. ७ वी

गट क्र. २ - इ. ८ वी ते इ. १० वी

**स्पर्धेचे ठिकाण** : आदर्श विद्यालय,
मुख्य सभागृह, बोपर्डी
ता. वाई, जि. सातारा.

वेळ : सकाळी ९.०० ते ११.००

दिनांक : १४ नोव्हेंबर

अधिकाधिक विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घ्यावा.

- मुख्याध्यापक

केतकी/केदार कुलकर्णी प्रगती विद्यालय, सातारा

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

तालुकास्तरावर आंतरशालेय चित्रकला स्पर्धा आयोजित केल्याबद्दल मा. मुख्याध्यापक यांना त्यांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

किंवा

स्पर्धेत इ. १० वी च्या वर्गातील वीस विद्यार्थ्यांना स्पर्धेत सहभागी करून घेण्याची विनंती करणारे पत्र मा. मुख्याध्यापकांना लिहा.

**किंवा**

**2. सारांशलेखन -**

**विभाग १ - गदय प्रं.१(इ) उतारा वाचा व त्याचा एकतृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

**(आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृति करा.** **(10)**

**(१) जाहिरातलेखन (60 ते 80 शब्द)**

**खालील विषयावर जाहिरात तयार करा**

घडयाळाचे दुकान - विविध प्रकार - योग्य किंमत - सवलत - सेवा मोफत - वर्षांची हमी

**(२) कथालेखन (80 ते 100 शब्द)**

**खालील मुद्द्यावरून कथा लिहा.**

**मुद्दे:**
एक पराभूत राजा - जंगलात पळून जाणे - गृहेत राहणे - काही दिवस - गृहेतून बाहेर न पडणे - कोळ्याच जाळे पाहणे - जाळे बांधण्यासाठी – कोल्याचे प्रयत्न - कोलया पासून स्फूर्ती - पुन्हा राज्य - मिळवणे - बोध


**(३) बातमीलेखन (80 ते 100 शब्द)**

आधारवड वृद्धनिवास, निर्मल नगर, पुणे येथे १ ऑक्टोबर या दिवशी जागतिक वृद्ध दिन संपन्न झाला.

**(इ) लेखनकौशल्य** **(8)**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणत्याही एक कृती सोडवा. (शब्दमर्यादा 100 ते 120 शब्द)**

**1)**




वरील कार्यक्रमात आपण सहभागी झालात अशी कल्पना करून प्रसंग लेखन करा.

**2)** नदीचे आत्मवृत्त :




**3)** वर्तमान पत्राचे महत्त्व -

मुद्दे -

वृत्त देणारी साधने - आकाशवाणी दूरदर्शन यांच्या मानाने वेगळेपणा - नसल्यास काय होईल - जनजागृतेचे काम - अपघात, संकटे यांच्या बातम्या समजतात - जग जवळ येते - मनोरंजन, कला, विज्ञान इत्यादी माहिती - जीवनात महत्त्वाचे स्थान.